पुणे, दिनांक २५.०७.२०२३

# वृत्तपत्र प्रसिद्धीसाठी

शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- लाभ अदा करण्यात येत आहे.

दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता माननीय प्रधानमंत्री महोदयांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधि योजने (PMKISAN) अंतर्गत चौदाव्या हप्त्यातील (एप्रिल, २०२३ ते जुलै, २०२३) देय्य लाभ देशातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सीकर, राजस्थान येथून ऑनलाइन समारंभाद्वारे वितरीत होणार आहे. या समारंभास मा. श्री. नरेंद्र सिंह तोमर, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, मा. डॉ. मनसुख मांडविया, केंद्रीय रसायने आणि खते आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या समारंभामध्ये कृषि विज्ञान केंद्रावर (KVK) https://pmindiawebcast.nic.in या लिंक चा वापर करून परिसरातील शेतक-यांना सहभागी होता येईल.

चौदाव्या हप्त्याची हस्तांतरित करावयाची रक्कम शेतकऱ्यांना खरीप हंगामात बियाणे, खते, औषधे सारख्या कृषी निविष्ठा खरेदी करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे .

माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू झाल्यापासून महाराष्ट्र राज्यात या योजने अंतर्गत दिनांक २५ जुलै, २०२३ अखेर ११०.५३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना एकूण रु. २३७३१.८१/- कोटी रक्कमेचा लाभ हस्तांतरित झाला आहे.

दि. २७ जुलै, २०२३ रोजीच्या समारंभात दिनांक १ एप्रिल, २०२३ ते दिनांक ३१ जुलै, २०२३ या कालावधीकरिता देय्य चौदाव्या हप्त्यावेळी महाराष्ट्र राज्यातील एकुण ८५.६६ लाख पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना साधारण रू. १८६६.४०/- कोटीचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केला जाणार आहे.

या योजनेचा लाभ आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. राज्यातील ८८.९२ लाख लाभार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्न लाभ अदायगीसाठी नोंदणीकृत झाले आहेत. उर्वरीत सर्व लाभार्थी यांनी PM KISAN योजनेचा लाभ जमा होण्यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न करण्याकरीता संबंधित बँकेत जाऊन आवश्यक अर्ज बँकेत सादर करून आधार संलग्न करण्याची प्रक्रिया पुर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

खरीप, २०२३ हंगामात विविध कृषी निविष्ठां खरेदीसाठी चौदाव्या हप्त्याचा हा लाभ शेतकऱ्यांना उपयुक्त ठरून कृषी उत्पादन वाढीला चालना मिळणार आहे.

---

(दिलीप झेंडे)
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

जा.क्र.कृ.गणना/पी.एम.किसान/प्रेसनोट/ /२०२३
दिनांक :- २५/०७/२०२३

**प्रति,**

कृषि उपसंचालक, माहिती विभाग,
कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे ०५